# समृद्ध जाणिवांचा सर्जनाविष्कार : पधारो म्हारो देस

**डॉ. विनोद कांबळे**
मराठी विभाग, म. ह. शिंदे महाविद्यालय,तिसंगी
ता.गगनबावडा जि.कोल्हापूर
ई.मेल.vinodspandan@gamil.com

*"साहित्य अकादमीच्या या प्रवास वृत्तीने मला माझी जागा दाखवली. अहंतेचा धुंदुर्मास विरला. माणूस समजून घ्यायचा परीघ विस्तारला. या एकांतानं गांभीर्याला गर्भ –हायला. लेखनासाठीच्या एकाग्रतेचं माहात्म्य मनात मुरलं. सर्जनासाठी अधिकचं बळ मिळालं. लिहिणाऱ्यानं कान आणि डोळं उघड ठेवून वावरावं हे समजलं. आपल्याला आकळत त्याप्रमाणे लिहावं आणि जमिनीवर पाय ठेवायला शिकवलं. आपल्याबी 'पल्याड' माणसं, साहित्य, संस्कृती समाज असतो हे कळालं. नाहीतर मी उनाडपणातच उंडारलो असतो. पुढारपणातच वहावलो असतो. महत्त्वाचं म्हणजे या प्रवासवृत्तीमुळे खराखुरा धान्यलो! काठोकाठ तुडुंबलो!! उरीमनी भरून पावलो !"*

विष्णू पावले यांच्या 'पधारो म्हारो देस' या प्रवासवर्णनातील या प्रस्तुतच्या शेवटच्या प्रकरणातील महत्त्वपूर्ण ओळी आहेत. १५७ पानांचं पुस्तक वाचल्यानंतर शेवटचे दोन उतारे वाचले की सारं सार कळावं इतकं आतून त्यांनी लिहिलं आहे. कवी, मुद्रितशोधक अशी त्यांची ओळख आहे. नव्या पिढीतील सामाजिक भान आत्मीयतेने जपणाऱ्या लेखकात त्यांचा समावेश गुणानुक्रमे करता येईल. आपल्या साहित्यिक पांडित्याचा उदोउदो करण्यापेक्षा सर्जनशील पातळीवर अत्यंत नम्रपणे सांगणे असा त्यांचा स्वभाव आहे. पावलेवाडी ते राजस्थान व्हाया शिवाजी विद्यापीठ अशा प्रवासात त्यांना साहित्य अकादमी, नवी दिल्ली यांनी तरुण लेखकास प्रवासवृत्ती दिली होती त्याचंच वृत्तांतकथन 'पधारो म्हारो देस' या ग्रंथात आहे.

मानवी जीवन अधिक विकसित होण्यामध्ये प्रवासाला खूप महत्त्व आहे. त्यामुळे प्रवास ही मानवी जीवनाची मूलभूत प्रेरणा मानता येईल. माणूस सतत एकाच ठिकाणी राहून कंटाळलेला, निरुत्साही झालेला असतो. त्यावेळी मन उत्साही करण्यासाठी तो प्रवासास निघतो. हा प्रवास खरेतर कुतूहलासाठी असतो. आपल्या ओळखीच्या क्षितिजापलीकडे जाऊन बघणे हा त्याचा हेतू असतो. प्रवास करत असताना प्रवासी, प्रवास आणि प्रदेश हे तीन मूलभूत घटक मानतात. प्रवासवर्णनामध्ये त्या प्रदेशाचे, तेथील सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक एकतेचे चित्रण येते. कलात्मक पद्धतीने मांडणी केली तर असे प्रवासवर्णन अधिकच वेगळे जाणवते. यासाठी जो प्रवास वर्णन करणारा लेखक आहे, त्याच्याजवळील कल्पकता त्याने नेमक्या शब्दांत मांडायला हवी. अशी प्रवासवर्णने मराठीत बऱ्यापैकी आलेली आहेत. काळ जसा बदलत गेला तसे प्रत्यक्ष अनुभवाचे क्षेत्र विस्तारत गेले. प्रवासवर्णनात लेखकाच्या व्यक्तिमत्त्वानुसार त्याची माहिती येत असते. अशा नव्या पिढीतील युवा लेखक विष्णू पावले यांनी 'पधारो म्हारो देस'ची मांडणी वेगळ्या पद्धतीने केलेली आहे.

एकूण एकवीस भागांची ही प्रवासवर्णनाची हकिकत १५७ पानांत सविस्तर चित्रित केलेली आहे.

मराठीतील ख्यातनाम समीक्षक प्रा. रणधीर शिंदे यांनी नेमकी आणि वाचनीय 'पाठराखन' केली आहे. शिवाजी विद्यापीठ मराठी अधिविभागात शिकत असताना प्रा.हिमांशू स्मार्त सरांचा तास आणि त्यांच्या प्रश्नावेळी वर्गात फक्त निवेदकाचा हात उभा होता. त्यातून दमन होणे, ज्यांच्या इच्छा दबून राहतात त्यांना आकाशी उंच उंच विहरतोय, अशी स्वप्न पडतात असे समजले. १६ जुलै २०१३ रोजी रणधीर शिंदे सरांनी फोन करून प्रवासवृत्तीची बातमी सांगितली. त्यावेळी 'कुरणात उंडारणा-या वासरागत मन चौखूर उधळू लागलेलं.' हा आयुष्यातील आनंदाचा क्षण होता. साहित्य अकादमीकडे आंध्रप्रदेश व राजस्थान या दोन राज्यांची नावे पाठवली होती. यावेळी वसुंधराराजे सिंधिया या (चोविसाव्या) पहिल्या मुख्यमंत्री बनल्या होत्या. त्यापेक्षा 'पधारो म्हारो देस'असा रंगीलोऽऽ राजस्थानच्या पल्याडचा राजस्थान मला बघायचा होता. अशी निर्मळ कबुलीही लेखक देतो. ४ जानेवारी २०१४ रोजी प्रवासासाठी उंब-याबाहेर पाऊल ठेवून राजस्थानच्या दिशेने प्रवास सुरू होतो.

मुंबईला ट्रॅव्हल्समधून जात असताना लहानपणीची थोरल्या भावासोबतची मुंबई फिरल्याची आठवणही आग्रहाने येते. ठाण्यात पोहोचल्यानंतर मित्र अभिनय पवार यांनी मन:पूर्वक स्वागत केले. दुसऱ्या दिवशी त्याने आवर्जून रजाही काढली आणि ५ जानेवारी २०१४ रोजी बांद्रा रेल्वे स्टेशनवर पोहचवण्यासाठी आला. त्याच्या मतानुसार आयुष्यातील ही सन्मानाची घटना आहे. कारण मराठी भाषेचा प्रतिनिधी म्हणून आपला मित्र जात असल्याचे त्याला समाधान वाटत होते. अजमेर एक्सप्रेसमध्ये बेभान होऊन डब्यात गेल्यावर प्रवासाला सुरुवात झाली. तात्पुरती जागा मिळाल्याने बोरवली स्टेशनला पाचव्या डब्यात जाण्यास सांगितले होते परंतु तिथे इंजीनियरिंगची मुले सह+लीला आली होतीत. या प्रवासाला जाताना अण्णा भाऊ साठे यांचे 'माझा रशियाचा प्रवास' या प्रवासवर्णनाचे वाचन केले.

या रेल्वे प्रवासाचे दोन भागाचे वर्णन प्रस्तुत वृत्तांतकथनात आले आहे. पहिल्या भागात बोरीवली ते अजमेर आणि दुसरा प्रवास अजमेर ते उदयपूर असा येतो. उदयपूरची ओळख सांगताना, "माउंट अबूचा पहाड एका बगलेला टाकून वाघिणीनं उदयपूरची वाट धरलेली'( पृ.२६) तर 'उदयपूर! ऐशी घाव झेलले तरी ज्यांनी रणातून माघार घेतली नव्हती, त्या बाप्पा रावलाच्या वंशातल्याच राणा संगा नावाच्या वीरपुरुषानं इथं राज्य केलं. तेच हे वीर पुरुषाचे.. सूर्योदयाचे शहर.. ! (पृ .२७) इतके नेमके वर्णन उदयपूर शहराचे केले आहे. कलाशिक्षक मिलिंद यादव, पत्रकार अनिल देशमुख यांनी काही परिचय यादी भेटीसाठी दिलेली होती. स्टेशनबाहेर उतरल्यानंतर अम्बावगढच्या पश्चिम प्रादेशिक संस्कृती केंद्रातील दीपक जोशी यांना भेटल्यानंतर त्यांच्या ठिकाणी शिबीर असल्यामुळे ते दुसरा पत्ता देतात. चंपालाल धर्मशाळा, देवदर्शन गेस्ट हाऊस, फतेह मेमोरियल आदी ठिकाण. याबरोबरच काही साहित्यिकांची नावेही भेटीसाठी दिलीत.

या प्रवासवर्णनात पहिली भेट झाली ती डॉ. के.के.शर्मा यांची होय. त्यांच्याशी साहित्यासंबंधी चर्चा करताना ते म्हणतात, 'साहित्य का प्रयोजन मनुष्य को सुसंस्कृत बनाना मानते है I साहित्य की आलोचना भाषा की राह से गुजर कर करते हैI" अशा विधानांनी लेखकाची प्रश्न विचारण्याची बोलती बंद झाली. दुसरी भेट सेक्टर चारमधील 'राजस्थान साहित्य अकादमी' इथे दिली.तिथे रामदयाल मेहरा यांची भेट झाली. पंचावन्न वर्षापूर्वी याची स्थापना झाली अजून त्याचं काम, पुस्तकेही पाहता आली. तिसरी भेट' भारतीय लोककला मंडळ' इथे तिकीट काढून कार्यक्रम बघितला. या मंडळाची स्थापना देवीलाल सामर यांनी केली आहे. राज्यस्थानंच वैशिष्ट्य म्हणजे इथे 'कळसूत्री बाहुल्यांचा खेळ' महत्त्वाचा असतो. चौसष्ट कलांपैकी ही एक कला असून त्याला 'कठपुतली' असेही म्हणतात. या शहराचं वैशिष्ट्य म्हणजे, "जिकडं तिकडं पांढ-या शुभ्र इमारती, कमानी आणि नक्षीकाम बघावं असं. इथं

पाणपोईला जलमंदिर, चित्रपटगृहाना पिक्चर पॅलेस अशी नावं तर कुस्त्यांच्या जंगी मैदानाला 'कुश्ती दंगल' अशी जाहिरात करणारं एक डिजिटल." अशा प्रकारचं जाणवतं. उदयपूर शहराचं मनमोहक वर्णन वाचनीय झालेले आहे. यावेळी दुपारी बाराच्या दरम्यान साहित्यिक डॉ. भाणावत यांची भेट होते. त्यांनीच भंडावून सोडणारा प्रश्न विचारल्यामुळे उत्तरे देण्याची अडचण निर्माण झाली. याचे वर्णन शब्दाची मांडणी जरी असली तरी काव्यात्मक पद्धतीने येते. याच ठिकाणी आशिया खंडातील दुसऱ्या क्रमांकाची 'बोहरा मशीद' असल्याचे कळते. यादरम्यानच डॉ.व्यास या लेखकाची मुलाखत घेण्याची संधी मिळते. अनेक साहित्यिक मुद्द्यावर चर्चा झाल्यानंतर त्यांचे अनेक विचार महत्त्वपूर्ण वाटतात. त्यातीलच एक म्हणजे, 'आदमी अपने सृजन से बडा होता हैI किताबो की संख्या से नहीI' (पृ.५१) असे सगळे प्रसंग, आठवणी इथे प्रस्तुत होतात.

उदयपूरहून चितोडगडकडे आठ जानेवारीला प्रवास सुरु केला. बसमध्ये तिकीट घ्यायला कंडक्टर लवकर येत नाही त्यामुळे भीती वाटते .शेवटी तो येतो. उदयपूरच्या रामदयाल मेहरा यांनी इथले कवी अब्दुल जब्बार यांचा फोन दिला होता. त्यांना फोन केला तर ते जवळपासच होते. यावेळी त्यांनी त्यांचा मित्र रामेश्वरलाल पांडे यांची ओळख करून दिली. त्यांनी व्हिजिटिंग कार्ड दिलं त्यात खूप चांगला मेसेज होता तो, 'अगर आप शाकाहारी रहेंगे I पशुपक्षी आपके आभारी रहेंगे I' दरम्यान शिवमृदुलजी आणि डॉ. रमेश मयंक यांच्याशी साहित्यिक गप्पा मारताना सुरुवातीला माझ्याबाबत त्यांना शंका आली होती परंतु नंतर निवडक कविता सादर केल्यानंतर आपणही कच्चे-बच्चे नाही याची जाणीव त्यांना झाल्याचे आवर्जून इथे नोंद केलेली आहे. ज्या लॉजमध्ये प्रवासादरम्यान आपण उतरलो होतो तिथे या रात्री बाराच्या दरम्यान खूप गोंधळ त्यामुळे शंकेला वाव होता अशी परिस्थिती निर्माण झाली होती. दुसऱ्या दिवशी राणी पद्मिनी किल्ल्याकडे प्रस्थान केले. येथे पद्मिनीचा महाल, विजयस्तंभ, पुढे आदिनाथ श्वेतांबर मंदिर. या गडावर रामलाल नावाची व्यक्ती ज्याचे वय सत्तरीच्या आसपास आहे तो भगवानाची सेवा करतो आणि ओवाळणीच्या पैशावरच आपली गुजराण करत असल्याचे चित्रण येते.

पुढील भागात अजमेर सोडून केंद्रीय विद्यापीठ राजस्थान येथील प्रसंगाचे चित्रण येते. या विद्यापीठात शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे सर होते. तिथं स्वागतासाठी जयसिंग नावाची व्यक्ती आली. तो विद्यापीठात मेस चालवत असे. इथे आल्यावर साळुंखे सरांना फोन केल्यानंतर दुसऱ्या दिवशी सकाळी साडेआठ पर्यंत येण्यास सांगितले. या विद्यापीठाची स्थापना २०१२ मध्ये झाली असून अकराशेच्या आसपास विद्यार्थी संख्या असल्याचे येथे नमूद केले आहे. ११ जानेवारी २०१४ रोजीची आठवण सांगताना आयुष्यात पहिल्यांदाच कमोड व शॉवरचा वापर केल्याचे लेखकाने सांगितले आहे. डॉ. साळुंखे सरांची भेट झाली. खूप चांगल्या आदरातिथ्याची आठवण येते. सरांनी अजमेरला सी.पी. देवल (नाटककार) यांची भेट घेण्यास सांगितले. नंतर अजमेरला जात असताना रणधीर शिंदे सरांना मेसेज केला. त्याला उत्तर म्हणून सरांनी सगळे लिहून ठेवण्यास सांगितले. इथे आल्यानंतर जब्बार यांच्याशी फोन करून दिनेश दिवाण, बद्रीप्रसाद पांचोली यांची भेट घेण्याचा प्रयत्न केला पण दोघेही बाहेर गावी होते. त्यामुळे अजमेर येथील प्रसिद्ध ख्वाजा नवाज दर्गामध्ये जाऊन दर्शन घेतले. विद्यापीठात थांबलेला हा तिसरा दिवस होता. यावेळी कादंबरीकार जितेंद्र भाटिया, आलोक श्रीवास्तव, कवी विजेंद्र यांच्याशी फोन झाला. परंतु तिघेही बाहेरगावी होते. येण्यास वेळ होता, त्यामुळे जयपूरला जाण्याचा निर्णय घेतला.

१३ जानेवारी २०१४ रोजी साळुंखे सरांना फोन करून जयपूरला रवाना होताना सारखं सैरभैर होत होतं. कारण गाव सोडून खूप दूर आल्याची जाणीव व्यक्त होते. यावेळी पत्रकार विजय चोरमारे यांनी डॉ. हेतू भारद्वाज यांचा नंबर दिला होता. त्यांना फोन केला. त्यांनी

घरी येण्यास सांगितले. गोपालपुरा त्रिवेणी नगर येथे मोठ्या उत्सुकतेने गेल्याचे वर्णन येते. डॉ. भारद्वाज यांचे वर्णन करताना 'अंगात गडद बदामी मातकट रंगाचा नेहरू शर्ट, त्यावर पांढऱ्या लोकरीचे हाफ स्वेटर, चेहरा स्वच्छ, निम सावळे, डोक्यावरच्या केसांवर चंद्रकृपा' (पृ १०३) असे आले आहे. त्यांच्याशी अगदी मनमोकळ्या गप्पा झाल्याचे इथे सांगितले आहे. या अगोदर डॉ. भारद्वाज कोल्हापूरच्या दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभेच्या तेविसाव्या संमेलनात निपाणीला उद्घाटक म्हणून आल्याची नोंदही येते. भारद्वाज यांनी आपल्या भेटीनंतर गोविंद माथूर यांना भेटायला सांगितले. माथूर यांचे कार्यकर्तृत्व खूप मोठं होतं. घरी पती-पत्नी दोघेच होते. प्रचंड नम्रता, सामाजिकता आस्था असलेल्या अशा साहित्यिकाबरोबर फोटो घेताना ते म्हणतात, 'मै क्षितिज से बढकर नही हू I' (पृ.१०६)त्यामुळे इतक्या मोठ्या लेखकाला भेटल्याचा आनंद व्यक्त होतो.

दुसऱ्या दिवशी प्रसन्न सकाळचे वर्णन येते. उमा नावाच्या कथालेखिकेला फोन केल्यानंतर त्यांनी दुपारी येण्यास सांगितले व पत्ता ऑलविज कॉलेज असा दिला. पण त्या परिसरात कुठेही या नावाचे कॉलेज नव्हते. एलबीएसचे (लालबहादूर शास्त्री) ऑलविज असे ऐकू आल्याने साऱ्या घोळाचे वर्णन चित्रित होते. इथेच दुष्यंत या कथालेखकाची भेट होते. गुलाबी थंडीचे दिवस पण भिकाऱ्यांचे कुडकुडणे लेखकाला अस्वस्थ करते. बुधवार १५ जानेवारी रोजी जयपूरहून माधोपूरला गेल्याचे वर्णन येते. याठिकाणी प्रभात या कवीची भेट होणार होती परंतु ते बाहेर होते. या प्रवासाला येत असताना दोन- तीन मित्रांकडून उसने पैसे घेऊन आल्याची नोंद आवर्जून लेखकाने केलेली आहे. कोटा शहर पाहण्याची उत्सुकता होती परंतु परत जाण्याची ओढही या दिवशी लागली होती.

१६ जानेवारी २०१४ रोजी मित्र अशोक पाटील यांचा कवी नामदेव ढसाळ गेल्याचा मेसेज आला. त्यामुळे निवेदक खूप अस्वस्थ असल्याचे दिसते. गावी जाण्याच्या ओढीने बाजारपेठेत खरेदी करण्यास गेल्यानंतर तेथील गर्दी बघून घुसमटल्यासारखे होते. येथे वडिलांना उंटाच्या कातडीचा जोड घेण्यासाठी दुकानात गेल्यानंतर दुसरी व्यक्ती खूप बार्गेनिंग करत होती. त्यातच आपण गेल्याने मालक आपल्याला बोलल्याचे सांगताना म्हणतो, 'आया बडा लेनेवाला I महाराष्ट्र का बोला महाराष्ट्र का रहनेवाला I' (पृ.१४५) ऐवढं त्याचं ऐकून घेऊनही आपण खरेदी केल्याचा खेदही मनाला वाटल्याचे चित्रण येते.

राजस्थानमध्ये अकरा दिवस हा प्रवास झाला. यामध्ये प्रवास भेटीची ठिकाणे, व्यक्ती, संस्था यांची वर्णने आलेली आहेत. धर्मशाळा सोडून मुंबईकडे जाण्याचा प्रसंगही येतो. १७ जानेवारी २०१४ रोजी सीएसटी स्टेशनला तिथून सेंट्रल बस स्थानकातून शिराळा बस मिळाली. या प्रवासादरम्यान जवळ एक मावशी बसते. तिच्याशी संवादातून आईची आठवण येते. गावात गेल्यानंतर गावकऱ्यांनी फेटा बांधून केलेला सत्कार ही हृदयस्पर्शीपणे चित्रित झालेला आहे.

एकूणच 'पधारो म्हारो देस' या प्रवासवृत्तांतामध्ये विष्णू पावले यांनी राजस्थानच्या भेटीचे नेमके वर्णन केले आहे. साहित्य अकादमीची तरुण लेखकास मिळालेली शिष्यवृत्ती त्यातून एका राज्यातून दुसऱ्या राज्यातील प्रवास, तिथे चौदा दिवसात फिरताना आलेले वेगवेगळे अनुभव, साहित्य, संस्कृती, कला या प्रकाराबद्दलची एक वेगळी अनुभूती अत्यंत साध्या सरळ भाषेत चित्रित केली आहे. लेखकाची भाषा ग्रामीण बाज असणारी असून तिला आपल्या बोलीचा एक लहेजा असलेला जाणवतो. अशा प्रवासवृत्तीतून फक्त फाईल तयार करून ठेवली जात नाही तर या साऱ्या घटना, प्रसंगांचे नेमके वर्णन केले तर चांगली साहित्यकृती निर्माण झाल्याचे या कलाकृतीकडे पाहिल्यानंतर जाणवते. त्यामुळे नव्या सर्जनशील लेखनभान असणाऱ्या संशोधक विद्यार्थ्यांना अशा प्रवासवृत्तीतून आपली जाणीव विस्तृत होण्यास मदत होते. त्याचबरोबर साहित्याच्या क्षेत्रात अशा प्रवासवर्णनातून फक्त फिरून आल्याचा आनंद व्यक्त न होता तिथल्या साहित्य,

VOL- IX ISSUE- VIII AUGUST 2022 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 7.331 ISSN 2349-638x

संस्कृती, कलांचे दर्शनही होते. नाहीतर आपण वैयक्तिक, कौटुंबिक पातळीवर सुट्टीचा आनंद घेण्यासाठी फिरतच असतो. परंतु या प्रवासवृत्तांतात अशा आनंदासाठी फिरल्याचा किंचितही स्पर्श जाणवत नाही.

**संदर्भ**

1. पधारो म्हारो देस - विष्णू पावले ,अक्षर वाड.मय प्रकाशन, पुणे (प्रथमावृत्ती- ०२ ऑक्टोबर २०२० )